महाराष्ट्र राज्य सहकारी परिषदेवर सदस्याची नियुक्ती करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : संकीर्ण-२०१९/प्र.क्र. ९४/२२-स
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २१ सप्टेंबर, २०१९.

वाचा

१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक: संकीर्ण-२०१८/प्र.क्र. २२/२२-स, दि. ५ एप्रिल, २०१८.
२) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक: संकीर्ण-२०१८/प्र.क्र. २२/२२-स, दि. १६ एप्रिल, २०१८.
३) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक:संकीर्ण-२०१८/प्र.क्र. १४२/२२-स, दि. १८ जुलै, २०१८.
४) सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे यांचे पत्र क्र.४-सआ/कायदा व वैधानिक कार्य/सह.परि./सदस्य नियुक्ती/म.शि.हिरे/६४४/२०१९, दिनांक १९.९.२०१९.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्य सहकारी परिषदेची संदर्भाधीन क्र.१ अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५४-अ (१) मधील तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन नव्याने पुर्नरचना करण्यात आली आहे. सदर परिषदेचा कार्यकाल दिनांक २१.०२.२०१८ पासून तीन वर्षे अथवा पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जो कालावधी कमी असेल तोपर्यंत राहील. तसेच, सदर परिषदेवर श्री.शेखर चरेगावकर यांची अध्यक्ष म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यानंतर सदर परिषदेवर संदर्भाधीन क्र. २ येथील शासन निर्णयान्वये सहा सदस्यांचा समावेश करण्यात आला व संदर्भाधीन क्र.३ अन्वये एका सदस्यांचा समावेश करण्यात आला. मात्र परिषदेचे कामकाज हाताळण्यासाठी आणखी सदस्यांचा समावेश करण्याची आवश्यकता असल्याने सहकार आयुक्त यांनी संदर्भाधीन क्र.४ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेमध्ये अन्य सदस्यांचा देखील समावेश करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५४-अ (१) मधील तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन या आदेशाद्वारे महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेची नव्याने पुर्नरचना संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. या परिषदेचा कार्यकाल दिनांक २१.०२.२०१८ पासून तीन वर्षे अथवा पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जो कालावधी कमी असेल तोपर्यंत राहील. महाराष्ट्र राज्य सहकार परिषद, पुणे या परिषदेवर सदस्य म्हणुन श्री.महेंद्र शिवाजी हिरे, मु.पो.देसराणे, ता.कळवण जि.नाशिक यांची नियुक्ती करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेची कार्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४-अ चे पोटकलम (३) प्रमाणे राहतील.

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharastra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०९२११८३८०१३९०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

RAJU KALLUJI NARPANDE

Digitally signed by RAJU KALLUJI NARPANDE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=445c05397d3e5fac583c028b06de2a1fa2b53743e982f5c31c9f3ffb560b0c16, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=f8faa195025519ecce143f48fe16b8572d279b7779146441b412b267fb25acd8, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAJU KALLUJI NARPANDE
Date: 2019.09.21 18:25:40 +05'30'

(राजू नरपांडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत :-

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
२. मा. मंत्री (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई,
३. मा. राज्यमंत्री (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाम, मंत्रालय, मुंबई,
४. श्री. शेखर चरेगावकर, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी परिषद,पुणे,
५. श्री. महेंद्र शिवाजी हिरे, मु.पो.देसराणे, ता.कळवण जि.नाशिक
६. प्रधान सचिव (सहकार) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे,
९. साखर आयुक्त, साखर आयुक्तालय, शिवाजीनगर, पुणे,
१०. निवड नस्ती का. २२-स.